प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA

संचार विभाग, केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
Department of Communication, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 022- 22660502

वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
ई-मेल/email: helpdoc@rbi.org.in

15 जून 2020

**बँकिंग विनियमन अधिनियम, 1949 (एएसीएस्), कलम 56 चे वाचन करीता, कलम 35 ए अंतर्गत निर्देश- कर्नाळा नागरी सहकारी बँक लि. पनवेल, जिल्हा – रायगड, महाराष्ट्र**

याद्वारे जनतेच्या माहितीसाठी हे अधिसूचित करण्यात येत आहे की, भारतीय रिझर्व्ह बँकेने, बँकिंग विनियमन अधिनियम, 1949 (एएसीएस) चे कलम 56 सह वाचन करता, कलम 35 ए उपकलम (1), च्या अन्वये, आपणाकडील निहित अधिकारांचा वापर करून दिनांक 15 जून 2020 च्या निर्देश सं DoS.CO.UCBs-West/D-1/12.07.157/2019-20 अनुसार कर्नाळा नागरी सहकारी बँक लि. पनवेल, जिल्हा – रायगड, महाराष्ट्र, या बँकेला काही निर्देश जारी केले आहेत, ज्यायोगे दिनांक 15 जून 2020 रोजी व्यवसायिक कामकाज संपल्यापासून, प्रशासक, वरील बँकेला भारतीय रिझर्व्ह बँकेच्या लेखी पूर्व परवानगीशिवाय कोणत्याही कर्जाचे आणि अग्रिम रकमांचे पुर्ननवीकरण करणार नाही, कोणतीही गुंतवणूक करणार नाही, निधी उसने घेणे आणि नव्या ठेवी स्वीकारणे यासहित कोणतीही देयता निर्माण करणार नाही, देयता किंवा बंधन निभावण्यासाठी किंवा अन्यथा, कोणतीही प्रदाने वितरित करणार नाही किंवा वितरित करण्याचे मान्य करणार नाही किंवा कसल्याही तडजोडीत किंवा व्यवस्थेत प्रविष्ट होणार नाही, किंवा भारतीय रिझर्व्ह बँकेच्या दिनांक 15 जून 2020 च्या या निर्देशामध्ये अधिसूचित असल्याखेरीज आपल्या कोणत्याही मालमत्तांची किंवा मत्तांची विक्री, हस्तांतरण किंवा अन्यप्रकारे विल्हेवाट लावणार नाही. उपरोक्त दिनांक 15 जून 2020 च्या निर्देशाची ची प्रत जनतेतील इच्छुकांना पाहण्यासाठी बँकेच्या वास्तूवर लावण्यात आलेली आहे. विशेषत: सर्व ठेवीदाराना त्यांच्या बचत खाते, चालू खाते किंवा इतर ठेवीचे कोणतेही खाते अशा सर्व खात्यांमधून जमा असलेल्या एकूण रकमेपैकी ₹500/- (रूपये पाचशे फक्त) पेक्षा जास्त नसलेली रककम उपरोक्त खातेदारास काढता येईल.

2. भारतीय रिझर्व्ह बँक व्दारा निर्गमित वरील निर्देश म्हणजे भारतीय रिझर्व्ह बँकेने बँकिंग परवाना रद्द केला आहे, असा त्यांचा अर्थ घेतला जाऊ नये. आपली वित्तीय स्थिती सुधारेपर्यंत ऊपरोक्त बँक या निर्बंधांसहित आपला बँकिंग व्यवसाय करणे सुरुच ठेवील. परिस्थितीनुसार या निर्देशांमध्ये बदल करण्याचा भारतीय रिझर्व्ह बँक विचार करील.

3. हे दिशानिर्देश दिनांक 15 जून 2020 च्या व्यवसायाच्या कामकाजाच्या समाप्तीपासून सहा महिन्यांच्या कालावधीसाठी लागू राहतील आणि त्या पुनरावलोकनाच्या अधीन असतील.

**(योगेश दयाल)**
मुख्य महाप्रबंधक

**प्रेस प्रकाशनी: 2019-2020/2501**